# कोल्हापूर जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितींचा परिचय

**डॉ. शहाजीराव धोंडीराम वारके**, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, कर्मवीर हिरे महाविद्यालय, श्री मौनी विद्यापीठ, गारगोटी

---

**प्रास्ताविक:**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील कृषी अर्थव्यवस्था ही भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे अंग आहे. आपल्या देशातील प्रमुख व्यवसाय शेती असून स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती झाली आहे. भारतातील शेतकरी, कृषी वैज्ञानिक, शासकीय धोरणे, खरेदी विक्री व्यवस्था व शेती संरचना यांचे परस्पर सहकार्याने हरितक्रांती यशस्वी झाली आहे.

जागतिक मुक्त अर्थव्यवस्थेत मागणी व पुरवठा या बाबी बाजारपेठेचे स्वरूप ठरवितात. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ खुली झाल्यामुळे शेती व्यवसाय बाजाराभिमुख झाला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या उत्पादित शेतीमालास विक्री प्रक्रियेत योग्य ती चालना मिळाली पाहिजे. भारतातील बाजार नियंत्रण फार पूर्वीपासून अस्तित्वात असून त्यामध्ये वेळोवेळी आवश्यकतेनुसार योग्य ते बदल करण्यात आले आहेत. शेतीमालाच्या खरेदी विक्री व्यवस्थेसंदर्भातील कायद्याचा प्रमुख उद्देश हा प्रामुख्याने शेतकऱ्यांचा माल योग्यरितीने विक्री केला जावा, त्याची फसवणूक होवू नये तसेच खरेदीदाराला एकत्रित माल मिळून त्याची सरस निरस प्रत ठरविता यावी, चांगल्या दर्जाचे शेतीमालाचे उत्पादन होण्यास उत्तेजन मिळावे, शेतीमालाची योग्य ती साठवणूक व्यवस्था व्हावी असा आहे. अशा उद्देशांच्या यशस्वीतेसाठी बाजार समित्यांची रचना करणेत आलेली आहे.

शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती ही केवळ शेतीतूनच मिळणाऱ्या उत्पादनाच्या परिणामावरच अवलंबून नसते, तर त्याने उत्पादित केलेल्या शेतीमालाला बाजारपेठेत किती किंमत मिळते यावर अधिक अवलंबून असते. शेतकऱ्यांची समृद्धी व शेतीसुधारणा विषयक धोरणांचे यश हे शेतकऱ्यांच्या शेतमालाला विक्री व्यवस्थेची किती प्रमाणात योग्य उपलब्धता असते यावर अवलंबून आहे. या विधानातच शेतमालाच्या विक्री व्यवस्थेचे मर्म व महत्त्व सामावले आहे.

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यास ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली असून राजर्षी शाहू महाराज व मा. वसंतदादा पाटील यांच्या विचाराने हे जिल्हे सामाजिक, आर्थिक, सहकार व राजकीय क्षेत्रातील वाटचाल करत आहेत. कोल्हापूर जिल्हा सधन असून जलसिंचन व कृषी क्षेत्रात प्रगती झाली आहे. सांगली जिल्ह्याचा निम्मा भाग नदीकाठचा सुपीक असून उर्वरित भाग दुष्काळी असल्याने त्याचा परिणाम संपूर्ण जिल्ह्याच्या विकासावर होतो.

कोल्हापूर जिल्ह्यात कोल्हापूर, गडहिंग्लज, वडगांव (पेठ), जयसिंगपूर या चार नियंत्रित बाजारपेठा कार्यरत आहेत. सांगली जिल्ह्यात सांगली, इस्लामपूर, तासगांव, पलूस, विटा व आटपाडी या सहा नियंत्रित बाजारपेठा कार्यरत आहेत. कोल्हापूर बाजारपेठेची स्थापना राजर्षी शाहू महाराजांच्या दूरदृष्टीने व उदार आश्रयाने झाली आहे. गडहिंग्लज व जयसिंगपूर या बाजारपेठांची निर्मिती राजर्षी शाहू महाराजांच्या दूरदृष्टीने झाली असून पेठवडगांव ही बाजार समिती मा. बळवंतराव यादव यांच्या प्रेरणेने स्थापन झाली आहे. सांगली बाजार समितीची स्थापना मा. वसंतदादा पाटील यांनी केली असून त्यांच्याच विचाराने जिल्ह्यातील इतर बाजार समितींची निर्मिती झाली आहे. सर्व बाजार समितींनी मुख्य बाजार आवार व आवश्यकतेनुसार उपबाजारांची निर्मिती केली आहे. बाजार समितींनी आपआपल्या गरजेनुसार उपबाजारांची निर्मिती केली आहे. बाजार समितींनी आपआपल्या क्षमतेनुसार बाजारपेठेत सुविधा पुरविल्या आहेत. बाजार समितींनी कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारचा शेतीमाल व जनावरे यांचे नियमन केले आहे. कार्यक्षेत्रातील शेतीमालाचे विशिष्ट उत्पादन यामुळे बाजार समितींनी बाजार पेठेची वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण केली आहे. कोल्हापूर बाजार समिती गूळाची बाजारपेठ म्हणून व सांगली बाजार समिती हळदीची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध आहेत.

कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्रातील एक अत्यंत संपन्न जिल्हा म्हणून ओळखला जातो. कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी अत्यंत कष्टाळू आणि कल्पक म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे. त्यांच्या कष्टाने कोल्हापूर जिल्ह्याची संपन्नता वाढली आहे. ऊस हे येथील प्रमुख पीक असून भात, सोयाबिन, भूईमुग, भाजीपाला व फुलशेतीतही कोल्हापूर जिल्हा प्रगती करत आहे. शेती व शेतीवर आधारित व्यवसाय हीच जिल्ह्याची प्रमुख ओळख आहे. येथील शेतकरी शेती व सहकार तसेच बाजारपेठांची सांगड घालून कृषी क्षेत्रात साखर निर्मिती, गुळ उत्पादन, भाजीपाला उत्पादन व फुले निर्यातीत अग्रेसर राहीला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १२ तालुक्यात १,२१७ गावे आहेत. त्यापैकी १०५ गावांमध्ये आठवडा बाजार भरतात. त्या ठिकाणी उत्पादक शेतकऱ्यांकडून ग्राहकांना शेतीमाल थेट खरेदी करता येतो. जिल्ह्यातील एकूण चार बाजार समित्या कृषी पणन क्षेत्रात कार्यरत असून मुख्य बाजार व उपबाजारामार्फत शेतीमालाच्या खरेदी विक्रीची अद्ययावत सुविधा उपलब्ध करुन देणेच्या कामी शासन, सहकारी संस्था व शेतकरी आणि व्यापारी यांच्यामध्ये समन्वयातून काम करत आहेत. जिल्ह्यात कोल्हापूर, गडहिंग्लज, वडगांव (पेठ) व जयसिंगपूर या चार नियंत्रित बाजारपेठा आहेत. बाजार समितींनी आपआपल्या कार्यक्षेत्रातील विशेष उत्पादित शेतीमालाच्या नियमनात आपला नावलौकिक मिळविला आहे. जिल्ह्यातील कृषी पणन व्यवस्थेच्या बळकटीकरणात बाजार समितींचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे.

**कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर :**

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या गादीवर आल्यानंतर शहरात गूळ आणि शेंगेची व्यापारपेठ स्थापन करुन तिचा विकास घडवून आणण्याच्यादृष्टीने प्रयत्न केले. कोल्हापूरचा गूळ, रंग, रुची व टिकावूपणाबद्दल प्रसिद्ध होता. येथील शेतकऱ्यांच्या उत्पादित गूळास कोल्हापूर येथेच बाजारपेठ मिळावी व परप्रांतात विक्रीसाठी माल पाठविताना शेतकऱ्यांचे होणारे नुकसान थांबावे व येथील शेतकरी सुखी व समृद्ध व्हावा या उदात्त हेतूने इ. स. १८९५ मध्ये छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुरात गूळ बाजारपेठेची स्थापना केली.

कोल्हापूरला मार्केट कमिटी स्थापन झाल्यानंतर काही अडचणीचे प्रसंग आले असले तरी बाजार समिती, व्यापारी, शेतकरी व इतर संबंधीत घटकांच्या सहाय्याने शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने बाजारपेठेचा विकास होत आला आहे. कोल्हापूर बाजार समितीस गूळ बाजारपेठ म्हणून नावलौकिक मिळाला आहे. आजही कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती गूळ उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी कामकाज करत आहे. गुळाबरोबरच कांदा, बटाटा, फळे, भाजीपाला व धान्याच्या व्यापारात सतत वाढ होत आहे. आजही कोल्हापूरची बाजार समिती थोर पुरोगामी नृपती राजर्षि शाहू महाराज यांच्या महान शिकवणुकीस व आदर्शास अनुसरुन आपले कार्य करत आहे.

कोल्हापूर बाजार समिती ही जिल्ह्यातील प्रमुख व सर्वात मोठी बाजार समिती आहे. राजर्षि शाहूंनी ही गूळ बाजारपेठ स्थापन केली होती. त्या काळापासून आजपर्यंत या बाजार पेठेंनी गुळाच्या व्यापारात देशात व परदेशात आपली ख्याती निर्माण केली आहे. कोल्हापूर बाजार समितीचा ‘अ’ वर्ग बाजार समितीत समावेश होतो. व्यापाराच्या सुविधांमुळे व बाजार समितीच्या कामकाज पद्धतीमुळे या बाजारपेठेत शेतीमालाची आवक कार्यक्षेत्राबरोबरच महाराष्ट्र, कर्नाटक तसेच देशाच्या इतर प्रदेशातूनही होते.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, गडहिंग्लज :**

गडहिंग्लजमध्ये छत्रपतींनी व्यापारासाठी पहिल्यांदा पिराजी पेठ वसविली. छ. शाहू महाराजांच्या पिताजींच्या नावाने ही पेठ एका गल्लीत सुरु झाली. येथे सर्व प्रथम मार्केट यार्डाचा श्रीगणेशा गिरविला गेला. नंतर बाजारपेठेचा व्याप वाढत राहिला व या पेठेचे रूपांतर सध्याच्या कृषि उत्पन्न बाजार समिती, गडहिंग्लज या व्यापार पेठेत झाले आहे.

गडहिंग्लज कृषि उत्पन्न बाजार समितीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांबरोबरच कर्नाटकातील शेतकरी बांधव दूरदुरुन आपला शेतीमाल विक्रीसाठी घेवून जातात. येथे सुरक्षितता, प्रतवारी, विश्वास व त्वरीत सेवा असा लौकिक समितीने मिळविला आहे. समितीच्या कार्यक्षेत्रात सोयाबिन, भात, भुईमूग शेंग, काजूबिया, रताळे, बटाटे, नाचणी व उस यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन आहे. बाजारपेठ मिरची, शेंग व गूळ यासाठी प्रसिद्ध आहे. येथील शेतकरी अलिकडे फुल शेतीकडेही लक्ष देत आहेत. गडहिंग्लज बाजार समिती शेतकऱ्यांच्या हितासाठी मार्केट यार्डाचे अद्यजनक राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या आदर्शानुसार व शासनाच्या कायद्यानुसार तसेच स्थानिक नेतृत्वाच्या आधाराने शेतकरी, व्यापारी व इतर घटकांच्या सहाय्याने आपल्या कार्यात सातत्याने प्रगती करत आहे.

**वडगाव शेती उत्पन्न बाजार समिती, वडगाव (पेठ)**

वडगाव हे गाव फार प्राचीन असून इतिहास प्रसिद्ध आहे. येथे धनाजी जाधवांची समाधी आहे. येथील बाजारपेठ फार जुनी असून, बऱ्याच वर्षांपासून या ठिकाणी जनावरे, शेळ्या, मेंढ्या, म्हैशी व बैलांचा बाजार मोठ्या प्रमाणात भरतो. हा बाजार दक्षिण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. तसेच शेंग, जोंधळा, कडधान्ये, गूळ, सोयाबीन वगैरेची बाजारपेठ अनेक वर्षांपासून चालू आहे. सदर गावी नगरपालिका असून तिचे काम उत्तमप्रकारे चालू आहे. अशा या पेठेमध्ये तारीख ९/१२/१९५९ इ. रोजी शासनाने मुंबई ॲग्रिकल्चरल ॲक्ट १९३९ अन्वये मार्केट कमिटीची स्थापना केली असून, संपूर्ण हातकणंगले तालुका कमिटीच्या कार्यक्षेत्राखाली येत आहे व संपूर्ण शेती उत्पादित मालाचे नियमन केले आहे.

वडगाव शेती उत्पन्न बाजार समिती ही कोल्हापूर व सांगली मार्केटच्या मध्यावर असलेने नियमित शेतीमालाचे आवकेवर त्याचा परिणाम होतो. तरीसुद्धा वडगाव (पेठ) ही बऱ्याच वर्षांपासून उताराची बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध असून येथून कोकणात धान्य, कडधान्ये व गळीताची धान्य रवाना होतात. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात इचलकरंजी हे औद्योगिक क्षेत्रात प्रसिद्ध असलेले शहर असून येथे बाजारपेठेच्या विस्तारासाठी चांगली संधी आहे. वडगाव येथे पूर्वीपासून चालत आलेला जनावरांचा बाजार आजही मोठ्या प्रमाणात भरतो आहे. कार्यक्षेत्रातील शेतकरी सध्या ऊस व सोयाबीन या नगदी पिकाबरोबरच भाजीपाला व फूलशेतीकडे वळला आहे.

**जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती, जयसिंगपूर :**

कोल्हापूर संस्थानाचे अधिपती श्रीमान छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांनी आपले जनकवडील कै. जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे चिफ ऑफ कागल यांच्या स्मरणार्थ या वसाहतीस जयसिंगपूर असे नामाभिदान केले. जयसिंगपूर या गावची वसाहत स्थापन करतेवेळी त्यावेळचे दरबारी मंडळींनी या गावची आखणी अगदी उत्तम आधुनिक पद्धतीनेच केली आहे. तसेच सदरची वसाहत एक उत्तमपैकी पेठ असावी हाच त्यावेळी मुख्य हेतू होता. म्हणूनच आज जयसिंगपूर गावात अगदी सरळ रेषेत आडवे व उभे प्रशस्त रुंद रस्ते व हवेशीर इमारतीची बांधणी झालेली दिसून येते. जयसिंगपूर येथे तंबाखूचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांची संख्या जास्त असून जयसिंगपूर पेठ ही महाराष्ट्रातील एक अग्रगण्य अशी तंबाखू पेठ म्हणून प्रसिद्धीस आली आहे.

जयसिंगपूर कृषि उत्पन्न बाजार समितीची मुख्य बाजार आवाराची जागा प्रशस्त असून या जागेवर एक अद्ययावत बाजार आवार उभे करणे आवश्यक आहे. समितीकडील तंबाखूचे नियमन थांबले असून स्थानिक शेतीमालाची आवक कमी झाली आहे. तालुक्यात उत्पादित होणारा ऊस हा साखर कारखान्यांना जातो व इतर भाजीपाला टोमॅटो, फ्लॉवर, फुले वगैरे शेतीमाल मोठ्या प्रमाणात मोठ्या बाजारपेठांमध्ये जात असलेने बाजार समितीच्या आवकेत व उत्पन्नात घट झाली आहे. व्यापाऱ्यांनीही बाजार आवारातील प्लॉटवर बांधकाम करुन व्यापाराची सुरुवात केलेली नाही. त्यामुळे मॉडेल ॲक्टच्या आधारे या बाजार आवारात शेतीमाल प्रक्रिया उद्योगांना परवानगी देवून बाजारपेठेचा विकास करणे आवश्यक आहे. तंबाखूचे नियमन बाजार समितीमार्फत चालू झालेस बाजार समितीस उर्जित अवस्था प्राप्त होईल.

**समारोप:**

कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी कष्टाळू असून ऊस उत्पादनात हा जिल्हा अग्रेसर आहे. सहकारी साखर कारखाने, दूध प्रकल्प व गूळ बाजारपेठ यामुळे जिल्ह्याची प्रगती झाली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १२ तालुके असून प्रशासकीय सोयीनुसार चार उपविभाग कार्यरत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात ४ बाजार समित्या कार्यरत आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील बाजारपेठांची स्थापना राजकीय इच्छाशक्तीतून व नेतृत्वाच्या दूरदृष्टीने झाली आहे. स्थानिक बाजारपेठांचेच पुढे बाजार समितीत रुपांतर झाले असून त्यांचे नियमन सध्या कायदेशीरपणे होत आहे.

**संदर्भ सूची** :


१. प्रा. किल्लोळ, जगदीश, पृष्ठाधार साहित्य, धनंजयराव गाडगीळ सहकारी संस्था, नागपूर, मार्च २००२.

२. प्रशिक्षण विभाग, Course Material Market Secretaries Training Programme, Government of India, Ministry of Rural Development of Marketing and Inspection Branch, Head office Nagpur.

३. व.शं. जोशी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ व नियम, १९६७, न्यायदिप प्रकाशन पुणे, २००३.

४. जिल्हा उपनिबंधक, कोल्हापूर. कोल्हापूर जिल्हा कृषी पणन आराखडा, पृष्ठ क्र. ३.

५. दादोबा चौगुले, 'कोल्हापूरची किर्ती दिगंत करणारी गूळ व्यापार पेठ' रौप्य महोत्सव ग्रंथ, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर. १९७०.